# फिरोदिया करंडक २०२३ नियमावली

1. फिरोदिया करंडक ही  स्पर्धा विविध गुणदर्शन स्पर्धा असून, यामध्ये विविध कलांचा अंतर्भाव असणे अपेक्षित आहे. ज्या विषयावर आधारित प्रयोग असेल त्याच विषयाशी संबधित कला प्रकार असणे आवश्यक आहे. म्हणजेच लेखन- दिग्दर्शन, अभिनय, नृत्य प्रकार, संगीत व इतर विशेष कला प्रकार.

2. वरील मुद्दयामध्ये नमूद केलेल्या सर्व कला प्रकारांपैकी लेखन ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे. उर्वरित सर्व कलाप्रकार सर्वोत्तम सादर झाले तरीही मूळ संकल्पना / लेखन / संहिता जर कमी दर्जाची किंवा व्यवस्थित लिहिली गेली नसेल तर त्याचा सांघिक गुणांवर नक्कीच परिणाम होतो आणि परिणामी सांघिक पारितोषिकाच्या बाबतीत संघ इतरांपेक्षा खाली जातो. म्हणून  लेखन हा या स्पर्धेचा दिग्दर्शनाइतकाच महत्त्वाचा घटक असल्याने त्यावर जास्तीत जास्त काम होणे अतिशय महत्त्वाचे आहे.

3. प्रयोगादरम्यान कुठल्याही प्रकारचे ध्वनिमुद्रित ( सिडी, कॅसेट, रेडी साउंडट्रॅक, पेन ड्राइव्ह इत्यादी ) संगीत वाजवता येणार नाही. संपूर्ण प्रयोगामध्ये कुठेही ध्वनिमुद्रणाचा  वापर केलेला आढळल्यास त्या महाविद्यालयाचा सांघिक  पारितोषिकासाठी विचार केला जाणार नाही. कुठल्याही प्रकारचे ट्रॅक अथवा लूप केलेला साऊंड वापरण्यास सक्त मनाई आहे.

4. सादर होणाऱ्या प्रयोगात निवडलेले संगीत आणि निवडलेले नृत्यप्रकार हे तुम्ही निवडलेल्या संकल्पनेशी आणि संहितेशी सुसंगत असावेत हे अत्यंत महत्वाचे आहे. तुमच्या नाटकासाठी कुठल्या प्रकारचे संगीत योग्य आहे आणि त्यासाठी कुठल्या गाण्यांची / संगीत प्रकाराची निवड करायची याचे संपूर्ण स्वातंत्र्य तुम्हाला आहे.

   **अ)** संपूर्ण सादरीकरणामध्ये हिंदुस्तानी शास्त्रीय संगीत आणि शास्त्रीय नृत्य योग्य पद्धतीने आणि योग्य ठिकाणी सादर करण्यात आल्यास त्याचा गुणांकनात सकारात्मक विचार होऊ शकतो.

   **आ)** शास्त्रीय संगीत आणि शास्त्रीय नृत्य (अथवा सर्वच संगीत आणि नृत्य प्रकार)  या कला प्रकारात वैयक्तिक पारितोषिके मिळविण्यासाठी त्याच्या सादरीकरणाचा वेळ आणि दर्जा हा महत्त्वाचा ठरतो. सादर केलेल्या कलेचा प्रभाव हा किती काळ टिकू शकतो त्यावर त्याचे मूल्यांकन अवलंबून आहे. त्यामळे सादर केलेले कलाप्रकार परिणामकारक झाले आहेत असे परीक्षकांना वाटल्यासच त्याचा पारितोषिकासाठी विचार केला जाऊ शकतो.

   **इ)** शास्त्रीय आणि पाश्चात्य कला यांचे फ्युजन करून, त्याचा प्रयोगात अयोग्य आणि अवास्तव वापर झाल्यास त्याचा मूल्यांकनात नकारात्मक परिणाम होतो. याचा अर्थ फ्युजन या प्रकारास मनाई आहे असे अजिबात नाही. किंबहुना त्याचा वापर किती योग्य पद्धतीने आणि परिणामकारक झाला आहे याला जास्त महत्व आहे.

5. स्पर्धेत एका संघात जास्तीत जास्त फक्त ३५ विद्यार्थ्यांना भाग घेता येईल. ते विद्यार्थी हे संबंधित विद्यालयाचे विद्यार्थी असल्याचा पुरावा सोबत असणे बंधनकारक आहे. फक्त ध्वनी संयोजन (म्हणजे समोरील बाजूस साउंड मिक्सर जवळ बसणारी व्यक्ती ) आणि प्रकाश योजना ( लाईट रूम मध्ये / पल्सर जवळ बसून काम करणारी व्यक्ती ) या दोन गोष्टींसाठी व्यावसायिकांचे ( महाविद्यालयाच्या बाहेरचे /  प्रोफेशनल ) सहाय्य घेता येईल. या दोन व्यक्तींचा समावेश ३५ विद्यार्थ्यांच्या यादीत समाविष्ट असणे आवश्यक आहे ( म्हणजेच ३३ + २ = ३५). ध्वनी व प्रकाश जर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी करण्याचे ठरविल्यास त्याचा सुद्धा समावेश ३५ च्या यादीमध्ये असणे आवश्यक आहे. थोडक्यात संघामध्ये कुठल्याही प्रकारे ३५ पेक्षा जास्त सदस्यांना परवानगी दिली जाणार नाही.

6. कॉलेज बाहेरील व्यावसायिकांचा वापर हा फक्त प्रकाश योजना व ध्वनी संयोजन (mixer) एवढयाच साठी बंधनकारक असेल. या व्यक्ती स्टेज वर कुठल्याही प्रकारचे सादरीकरण करताना आढळल्यास संबंधित महाविद्यालयाचा सांघिक व वैयक्तिक पारितोषिकांसाठी विचार केला जाणार नाही.

7. अ ) जी विद्यापीठे (private / Government) पुणे विद्यापीठ अथवा इतर कुठल्याही विद्यापीठांतर्गत आहेत व ज्यांना स्वतंत्र / स्वायत्त दर्जा आहे, अशा विद्यापीठांतर्गत निर्माण झालेल्या महाविद्यालयांना कुठल्याही प्रकारे विद्यापीठाच्या नावाने स्पर्धेत भाग घेता येणार नाही. वर नमूद केलेल्या महाविद्यालयांना त्यांच्या महाविद्यालयाच्या नावानेच स्पर्धेमध्ये सहभागी होता येणार आहे. एकापेक्षा अधिक महाविद्यालयांना एकत्र येऊन एक संघ बनवता येणार नाही. स्वतंत्र महाविद्यालयाच्या नावाने व त्याच महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा संघ घेऊन स्पर्धेत सहभागी होता येणार आहे. Campus जरी एक असला परंतु महाविद्यालय वेगळे असेल तरी सुद्धा एक पेक्षा अधिक महाविद्यालय एका संघात येऊ शकणार नाहीत याची नोंद घ्यावी.

ब) ज्या विद्यापीठांची नोंदणी – स्टेट प्रायवेट युनिवर्सिटी ॲक्ट च्या अंतर्गत झाली आहे व ज्यांची वन कॅम्पस वन युनिवर्सिटी असा नियम आहे, तसेच ज्या विद्यापीठाची इतर कुठेही शाखा अथवा संलग्न महाविद्यालये नाहीत, अशा प्रकारच्या युनिवर्सिटी मध्ये कुठल्याही प्रकारच्या निरनिराळ्या महाविद्यालयांची निर्मिती झालेली नाही, अशा प्रकारच्या युनिवर्सिटीना त्यांच्या युनिवर्सिटी च्या नावे स्पर्धेत सहभागी होता येऊ शकेल. या स्वरूपाच्या युनिवर्सिटी मध्ये असणाऱ्या निरनिराळ्या विभागांमधील ( महाविद्यालयांमधील नाही ) विद्यार्थ्यांना एका संघात सहभागी होता येणार आहे. ह्या सर्व विद्यार्थ्यांची I CARDS एक सारखी असणे आवश्यक आहे.

8. विद्यार्थी लेखक अथवा विद्यार्थी दिग्दर्शक हा ३५ च्या संघात असणे बंधनकारक नाही. जर तो विद्यार्थी लेखक अथवा विद्यार्थी दिग्दर्शक संबधित महाविद्यालयातील असतील, तर त्यांचा वैयक्तिक पारितोषिकासाठी विचार केला जाऊ शकतो. लेखक व दिग्दर्शक यांचे सादरीकरणात काही काम नसेल तर त्यांना फक्त वैयक्तिक पारितोषिकासाठी म्हणून ३५ च्या यादीत असणे बंधनकारक नाही. ( **हा नियम फक्त लेखक व दिग्दर्शक यांच्या पुरताच मर्यादित आहे**)

9. संबधित महाविद्यालयाच्या प्राध्यापकांना / स्टाफ ला कुठल्याही कारणासाठी स्टेज वर प्रवेश दिला जाणार नाही. फक्त प्रकाश योजना व संगीत संयोजनासाठी जर व्यावसायिक म्हणून त्यांना यायचे असेल तर तशी संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांची पूर्व मान्यता घेतलेली असणे जरुरी आहे.

10. स्पर्धेचे सादरीकरण किमान ३० मिनिटे व कमाल ४५ मिनिटांचा असावा हे बंधनकारक आहे. पडदा उघडल्यापासून ३० मिनिटांपेक्षा कमी व ४५ मिनिटांपेक्षा जास्त सादरीकरण झाल्यास त्या संघाचा सांघिक पारितोषिकासाठी विचार केला जाणार नाही. परंतु अशा बाद झालेल्या संघाला वैयक्तिक पारितोषिके मिळत असल्यास, ती द्यावीत किंवा नाही याचा निर्णय संयोजक व परीक्षक घेतील, या बाबत कोणताही खुलासा देण्याचे बंधन संयोजकांवर आणि परीक्षकांवर नाही.

11. प्रत्येक महाविद्यालयास एकूण ६५ मिनिटे वेळ देण्यात येईल, त्यापैकी पहिली १५ मिनिटे सेट लावण्यासाठी, पुढील ५ मिनिटे फक्त वाद्य लावण्यासाठी ( Tuning साठी ) व त्यानंतरचा ४५ मिनिटांचा वेळ प्रयोग सादरीकरणासाठी राहील.

12. स्टेज ताब्यात दिल्यानंतर सेट लावायला सुरुवात करण्या आधी पहिली घंटा देण्यात येईल, त्यानंतर १५ मिनिटांनी दुसरी घंटा देण्यात येईल. वाद्य लावण्यासाठीचा ५ मिनिटांचा कालावधी संपल्यानंतर तिसरी घंटा देण्यात येईल. मुख्य सादरीकरणाची ४५ मिनिटे तेव्हापासून मोजली जातील.

13. सर्व कला स्टेजवरच तयार करणे व सादर करणे बंधनकारक आहे. स्टेजवर सादर होणाऱ्या सर्व कला या प्रेक्षक व परीक्षकांना दिसाव्यात अशा जागेवर असाव्यात. एखादी कला विंगेमध्ये तयार करून स्टेजवर आणून दाखविली तर त्याचा बक्षिसासाठी किती विचार करावा याचा निर्णय संयोजक व परीक्षक घेतील.

14. स्टेजवर एका वेळेस किती ठिकाणी चित्रकला करावी याचे योग्य नियोजन महाविद्यालयाने करावे. चित्रकलेचा वापर हा संकल्पनेशी सुसंगत व आवश्यकते नुसार असावा. अनावश्यक चित्रकला टाळावी, तुम्ही एकूण किती चित्र काढता याला महत्त्व नसून, सर्व चित्रे योग्य जागी व चित्रांचा दर्जा किती चांगला आहे याला जास्त महत्व दिले जाईल. याचा अर्थ चित्रकलेस मनाई आहे व चित्रकला नाही केली तरी चालू शकते असा कृपया गैरसमज करून घेऊ नये.

15. स्पर्धेमध्ये एकूण किती इव्हेंट अथवा फाईन आर्ट्स चे प्रकार करायचे याची कुठलीही संख्या ठरलेली नाही. म्हणून जास्तीत जास्त इव्हेंट केले म्हणजे सांघिक पारितोषिक मिळते अथवा कमी इव्हेंट तरी पारितोषिक मिळते वगैरे वगैरे ... याचा कुठलाही लिखित नियम आम्ही कधीही केलेला नाही अथवा तसा आमचा विचारही नाही. म्हणून इव्हेंट्सची निवड करताना ते तुमच्या सादरीकरणासाठी किती महत्त्वाचे, नाविन्यपूर्ण आणि किती प्रभावी आहेत याचा विचार करूनच सादर करावेत. इव्हेंट्सची संख्या किती आहे त्यापेक्षा इव्हेंट्सचा दर्जा, त्याचा सुसंगतपणा व त्याचे योग्य वेळी केलेले सादरीकरण याला जास्त महत्त्व देण्यात येईल.

   अ) शॅडो प्ले, UV आर्ट, sand ॲनिमेशन आणि रेडियम आर्ट हे सर्व कलाप्रकार प्रयोगात वापरल्यानेच सांघिक पारितोषिक अथवा फिरोदिया करंडक मिळतो हा गैरसमज आहे. त्यामुळे नमूद केलेल्या प्रकारांचा अवास्तव वापर झाल्यास त्याचा मूल्यांकनात नकारात्मक परिणाम होतो. त्यामुळे वरील कला प्रकारांचा आपल्या प्रयोगात कितपत फायदा होणार आहे, तसेच ह्या कला सादर करण्याचा आपला दर्जा किती चांगला आहे ह्याचे आत्मपरीक्षण करून त्याचा प्रयोगात वापर करावा अन्यथा ते टाळावे.

16. संयोजकांतर्फे स्टेजवर किमान लाईट्स, स्पीकर्स, व इतर स्टेज प्रॉपर्टी मिळेल. त्या व्यतिरिक्त प्रयोगासाठी लागणारे साहित्य उपलब्ध करून देण्याची जबाबदारी संयोजकांवर नाही, ह्याची जबाबदारी संबंधित संघावर राहील. सर्व महाविद्यालयांना समान साऊंड सिस्टिम देण्यात येणार आहे. सर्व महाविद्यालयांना संयोजकांतर्फे देण्यात येत असलेलीच साऊंड सिस्टिम वापरणे बंधनकारक आहे .जास्तीचे पैसे भरून कुणालाही स्वतःसाठी वेगळी साऊंड सिस्टिम आणता येणार नाही. संयोजकांतर्फे देण्यात येणाऱ्या साऊंड सिस्टिम चे कुठलेही भाडे आकारले जाणार नाही, ही सुविधा संयोजकांतर्फे विनामुल्य देण्यात येईल.

17. स्पर्धेच्या वेळी रंगमाच्यावर लागणाऱ्या साहित्याची (म्हणजे लेव्हल्स, मोडे इत्यादी ) यादी जी संयोजकांतर्फे पुरविली जाते, ती सर्व यादी कार्यक्रम सादर होण्यापूर्वी दोन दिवस आधी संयोजकांकडे सुपूर्द करण्यात यावी. यादी ठरलेल्या वेळेत संस्थेच्या कार्यालयात पोहोचली नाही तर, प्रयोगासाठी लागणारे कुठलेही साहित्य संयोजकांतर्फे देण्याची कुठलीही जबाबदारी संयोजकांवर राहणार नाही.

18. प्रयोगाची संहिता, सर्व सहभागी विद्यार्थ्यांची मा. प्राचार्यांच्या मान्यतेने केलेली अंतिम यादी, ध्वनी व प्रकाश योजनेचा आराखडा, सादर होणाऱ्या कला प्रकारांची यादी कार्यक्रमाच्या दोन दिवस आधी संयोजकांकडे सुपूर्द करण्यात यावी, अन्यथा संबंधित महाविद्यालयाच्या प्रवेश अर्जाचा विचार केला जाणार नाही.

19. रंगमंचावर वापरलेल्या कुठल्याही वस्तूची म्हणजेच नाट्यगृह व संयोजकांतर्फे दिलेल्या साहित्याची तोडफोड अथवा नासधूस झाल्यास त्याची भरपाई संबंधित संघ अथवा महाविदयालयांना करावी लागेल व त्याची त्वरित भरपाई करून द्यावी लागेल. ते नुकसान किती झाले हे स्पर्धा संयोजन समिती व संबंधित नाट्यगृह प्रशासन ठरवेल. ह्याची संपूर्ण जबाबदारी महाविद्यालयाच्या संघ प्रमुखावर असेल.

20. स्पर्धा चालू असताना तिथे उपस्थित असलेल्या स्पर्धक व संबंधित महाविद्यालयाचे विद्यार्थी / प्रेक्षक अथवा सहकारी यांचे वर्तन शांततेचे असावे. इतरांना त्यांच्या वागण्याचा त्रास होईल अथवा चालू असलेल्या सादरीकरणामध्ये कुठलाही अडथळा / व्यत्यय येईल असे वर्तन असू नये. अशा महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी कुठल्याही प्रकारचे गैरवर्तन केल्याचे आढळून आल्यास व इतर महाविद्यालयांना त्याचा त्रास झाला आहे असे आम्हाला आढळून आल्यास, त्या संबंधित महाविद्यालयाचा संघ प्रमुख जबाबदार राहील व त्या संबंधित महाविद्यालयावर योग्य ती कारवाई संयोजकांतर्फे केली जाईल.

21. स्पर्धेतील सादरीकरणाची सर्व जबाबदारी संघ प्रमुख व संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांची असेल . कार्यक्रमाचे लेखन व सादरीकरण हे त्यांनी तपासून घ्यावे. एकूण सादरीकरणात कुठेही अश्लील / बिभत्स हावभाव असणार नाहीत याची काळजी घ्यावी. तसेच प्रयोगात वापरण्यात आलेली भाषा आक्षेपार्ह नसावी ह्याची काळजी घ्यावी व तसेच विद्यार्थी म्हणून नैतिकतेची व वागण्याची मर्यादा स्पर्धकांनी सांभाळावी. या सूचनांचे योग्य पालन न झाल्यास संबंधित स्पर्धक जबाबदार राहतील व महाविद्यालयाच्या सांघिक अथवा वैयक्तिक पारितोषिकांवर त्याचा विपरीत परिणाम होऊ शकतो.

22. **फिरोदिया करंडक विविध गुणदर्शन स्पर्धा ही महाविद्यालयीन युवकांच्या प्रतिभेला उपलब्ध करून दिलेले स्पर्धात्मक व्यासपीठ आहे . संयोजक या नात्याने युवकांची सृजनशीलता, कलागुण आणि कौशल्य यांना वाव देणे आमचे कर्तव्य आहे. त्यामुळे आपल्या महाविद्यालयाच्या संघाने सादरीकरणासाठी निवडावयाचा विषय आणि इतर कला प्रकार व त्याचे सादरीकरण कसे करावे ह्याचे संपूर्ण स्वातंत्र्य महाविद्यालयांना आहे. परंतु अतिशय खिलाडू वृत्तीने आयोजित होणाऱ्या या स्पर्धेत काही विधिनिषेद पाळणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने सादरीकरणाचा विषय निवडताना खाली नमूद केलेल्या बाबींचे आवर्जून पालन करणे बंधनकारक आहे**

    अ) निवड केलेल्या संहितेमध्ये कुठल्याही प्रकारे धार्मिक अथवा जातीय तेढ निर्माण होणार नाही याची काळजी त्या त्या संघाने घ्यावी, त्यामुळे संहितेची निवड करताना ह्याचा अतिशय गांभीर्याने विचार करण्यात यावा. जर अशा स्वरूपाच्या आक्षेपार्ह संहिता निवड केल्या गेल्या आणि त्या बाबत शासनामार्फत अथवा इतर कुठल्याही संस्थेमार्फत कुठल्याही प्रकारे कारवाई केली गेली तर त्याचा संयोजक या नात्याने आमचा काहीही संबंध नसेल याची कृपया नोंद घ्यावी, किंबहुना अशी वेळ कुठल्याही संघावर येऊ नये याची खबरदारी सर्व संघांनी सुरुवातीपासूनच घ्यावी.

    आ) **स्पर्धेमध्ये सर्वोत्कृष्ट विनोदी सादरीकरणाचे स्वतंत्र सांघिक पारितोषिक देण्यात येणार आहे**. हे सादरीकरण जर स्पर्धेच्या सर्व निकषांमध्ये बसत असेल तर याचा सांघिक प्रथम, द्वितीय व तृतीय पारितोषिकासाठी सुद्धा विचार केला जाऊ शकतो. जर असा संघ प्रथम, द्वितीय, तृतीय पारितोषिकासाठी पात्र होत नसेल तर त्याचा स्वतंत्र विनोदी सादरीकरणासाठी विचार केला जाऊ शकतो. परंतु कुठल्याही प्रकारे स्पर्धेच्या निकषांमध्ये बसत नसेल तर स्वतंत्र सर्वोत्कृष्ट विनोदी सांघिक पारितोषिक देण्याचे बंधन संयोजकांवर नाही याची कृपया नोंद घ्यावी . ह्या परिस्थितीमध्ये सर्वोत्कृष्ट विनोदी सादरीकरणाचे स्वतंत्र पारितोषिक द्यायचे किंवा नाही ह्याचा सर्वस्वी अधिकार संयोजक व परीक्षक यांचा असेल.

23. पारितोषिक वितरण समारंभात विजेत्या संघांना पारितोषिक वितरण कार्यक्रमाच्या दिवशी सादरीकरण करणे बंधनकारक राहील. त्यासाठी कलाकारांना तसेच महाविद्यालयाला कुठल्याही प्रकारचे मानधन देण्यात येणार नाही. पारितोषिक वितरण सोहळा हा स्पर्धेचा महत्वाचा भाग असल्यामुळे स्पर्धेचे नियम या सोहळ्यात सुद्धा लागू असतील. **पहिल्या तीन सांघिक विजेत्या संघांना** पारितोषिक वितरण सोहळ्याच्या आधी फिरोदिया करंडक स्पर्धेव्यतिरिक्त कुठेही प्रयोग करता येणार नाही किंवा इतर कुठल्याही स्पर्धेसाठी करता येणार नाही याची नोंद घ्यावी. असे आढळून आल्यास पुढील वर्षी संबंधित महाविद्यालयाला स्पर्धेत भाग दिला जाणार नाही. पारितोषिक वितरण समारंभाच्या दिवशी एकूण किती संघांची सादरीकरणे करायची याचा सर्वस्वी निर्णय संयोजक घेतील. पारितोषिक वितरण समारंभासाठी येणारे प्रमुख पाहुणे, त्यादिवशी नाट्यगृहामध्ये उपलब्ध असणारा वेळ व एकंदरीत परिस्थिती बघून किती संघांचे सादरीकरण कुठल्या क्रमाने ठेवायचे याचा सर्वस्वी निर्णय संयोजक घेतील. त्या संबंधाने परिस्थिती नुसार वेळोवेळी बदल करण्याचे अधिकार संयोजकांना असतील.

24. पारितोषिक वितरण समारंभासाठी निवडक तीन संघाना जर संपूर्ण कार्यक्रमाचे शूटिंग व फोटो हवे असतील तर त्याची पूर्वकल्पना देणे व रक्कम कार्यालयात भरणे अपेक्षित आहे. जर ही रक्कम नियोजित वेळेत भरली नाही तर शूटिंग तसेच फोटोची प्रत संबंधित महाविद्यालयास मिळणार नाही. पारितोषिक समारंभासाठी कुठल्याही वैयक्तिक अथवा बाहेरील व्यक्तीस चित्रीकरण करू दिले जाणार नाही.

25. परीक्षकांचा निकाल हा अंतिम निर्णय असेल व त्याबद्दलचे कुठलीही स्पष्टीकरण देण्याची जबाबदारी संयोजक व परीक्षक यांच्यावर नसेल.

26. स्पर्धा संबंधाने कुठल्याही प्रकारचा बदल अथवा नियम व संयोजन संबंधाने कोणताही निर्णय हा संयोजकांचा अंतिम निर्णय राहील. हे बदल करण्याचे सर्व अधिकार संयोजन समिती स्वतःकडे राखून ठेवित आहे. याचे कुठलेही स्पष्टीकरण देण्याची अथवा न देण्याचे अधिकार संयोजन समिती राखून ठेवीत आहे.
    - या व्यतिरिक्त कुठल्याही प्रकारचे प्रश्न, अधिकची माहिती, तांत्रिक समस्या इत्यादीची नोंद महाविद्यालयांनी करून ठेवावी. या सर्व बाबींची चर्चा प्रत्यक्ष बैठकीत केली जाईल. बैठकीचा दिवस वा वेळ संबंधित महाविद्यालयाच्या विद्यार्थी प्रतिनिधींकडे कळविण्यात येणार आहे.

**फिरोदिया करंडक २०२३ स्पर्धेच्या प्राथमिक फेरीसाठी थेट निवड झालेली महाविद्यालये - खालीलप्रमाणे**

१.सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय **(गलबत )**
२. गरवारे वाणिज्य महाविद्यालय , पुणे (**पिनी** )
३. सर परशुरामभाऊ महाविद्यालय,पुणे **(संगीत मुमल महेंद्र)**
४ . डी .वाय .पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, आकुर्डी **(निळे पसारे)**
५. विश्वकर्मा इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नोलॉजी पुणे **(पॅरलल पाऊस)**
६ . ILS विधी महाविद्यालय पुणे (बिगुल )
७.बृहन्महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालय (**रिंगण** )
८ .राजर्षी शाहू अभियांत्रिकी महाविद्यालय ,ताथवडे (**झेहात** )
९. फर्गसन महाविद्यालय, पुणे **(ए हैरत – ए आशिकी)**
१०. गोखले इंस्टिट्यूट ऑफ पॉलिटीक्स अॅड इकॉनोमिक्स, पुणे **(ओ माय सेपियन !)**
११ .एम .आय .टी.डब्लू.पी .यु .( **द फेनटीक )**
१२ . पिंपरी चिंचवड अभियांत्रिकी महाविद्यालय **(संभ्रम निरंतर )**

१३ .मॉडर्न कला ,शास्त्र आणि वाणिज्ज महाविद्यालय, पुणे **(काय समजलीव?)**
१४. प्रतिभा वाणिज्य आणि संगणक अभ्यास महाविद्यालय (**स्पर्श** )
१५. विश्वकर्मा इन्स्टिट्यूट ऑफ इनफोरमेशन टेक्नोलॉजी पुणे **(विष्णुदासा)**
१६. जी .सी .ओ .ई .औरंगाबाद **(विठ्ठल )**
१७ .ए.आय .एस.एस.एम .एस अभियांत्रिकी महाविद्यालय (**भूत मारीच्या )**
१८. झील अभियांत्रिकी महाविद्यालय (**फनकार** )
१९. डॉ . डी .वाय .पाटील इन्स्टिट्यूट ऑफ इ .एम .आर **(कायदा झाला डॉक्टर )**
२० . ए.आय .एस .एस एम .एस इन्स्टिट्यूट ऑफ इन्फोर्मेशन टेकनॉलोजी **(अल्लार दुर्र )**
२१. पी .सी .सी .ओ .इ .ऍन्ड आर ,रावेत **(समीकरण )**

२२. प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे मॉडन अभियांत्रिकी महाविद्यालय **(परमो धर्मः)**

27. पुढील वर्षीच्या स्पर्धेमध्ये थेट प्राथमिक फेरीसाठी निवड करण्याच्या दृष्टीने मागील वर्षी केल्याप्रमाणे याही वर्षी सर्व संघांचे प्राथमिक फेरीतील परीक्षकांमार्फत मूल्यमापन करून पुढील वर्षीच्या नवीन संघांची यादी जाहीर केली जाईल, त्या संदर्भातील इतर सर्व अधिकार संयोजन समिती राखून ठेवीत आहे. तसेच वरील महाविद्यालयांच्या यादी मध्ये संख्या कमी अथवा अधिक करण्याचा अधिकार संयोजन समिती व परीक्षक यांचा राहील.

**( नियम क्रमांक २८ ते ३० हे पूर्व प्राथमिक फेरीसाठीचे आहेत याची कृपया नोंद घ्यावी )**

28. पूर्व प्राथमिक फेरीचे परीक्षण हे प्रामुख्याने सादरीकरणाची तयारी, लेखन , दिग्दर्शन , अभिनय , नृत्यप्रकार , संगीत व इतर प्रकार या सर्व कलांची गुंफण किती चांगल्या प्रकारे महाविद्यालयाने केली आहे यावर केली जाणार आहे.

29. पूर्व प्राथमिक फेरीमधून किती महाविद्यालयांना प्राथमिक फेरी मध्ये निवडावे हा निर्णय संयोजक व परीक्षक घेतील. किती महाविद्यालयांची निवड करायची याची कुठलीही संख्या संयोजकांतर्फे निश्चित केली गेलेली नाही.

30. पूर्व प्राथमिक फेरीसाठी मर्यादित साहित्य संयोजकांकडून उपलब्ध करून दिले जाईल. उपलब्ध करून दिलेल्या साहित्यापेक्षा जास्तीचे साहित्य उपलब्ध केले जाणार नाही. पूर्व प्राथमिक फेरीमध्ये विद्यार्थ्यांनी गरजेपुरतेच साहित्य वापरून प्रयोग करून दाखविणे अपेक्षित आहे. तसेच महाविद्यालयांनी स्वतःचा जास्तीचा खर्च करून सुद्धा अधिकची प्रकाश योजना करता येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

**वरील सर्व नियम व अटी आम्हाला मान्य आहेत, तसेच ह्या सर्व नियमांचे पालन आमच्या महाविद्यालयातील संबंधित विद्यार्थ्याकडून केले जाईल आणि संबंधित महाविद्यालयास फिरोदिया करंडक स्पर्धेत भाग घेण्यासाठीची परवानगी अशा स्वरूपाचे पत्र महाविद्यालयाच्या माननीय प्राचार्यांच्या सही व शिक्क्याने प्रवेश सादर करतेवेळी आमच्या कार्यालयात देणे बंधनकारक आहे.**

आपला

अजिंक्य सुर्यकांत कुलकर्णी
संयोजक, फिरोदिया करंडक,
सामाजिक आर्थिक विकास संस्था, स्वप्नभूमी
संपर्क – अजिंक्य कुलकर्णी ९८२२४२२४४४